**MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING FOR PROPOSED EXPANSION IN EXISTING SUGAR UNIT FROM 2,500.0 TCD TO 4,800.0 TCD (EXPANSION OF 2,300.0 TCD), COMMISSIONING OF NEW CO-GENERATION PLANT OF 18.0 MW & INSTALLTION OF MULTI-FEED DISTILLERY PLANT OF 150.0 KLPD BASED ON C MOLASSES/B HEAVY MOLASSES/SYRUP & GRAIN AS RAW MATERIAL AT JAJNUR-ZARI, MOUJE AMBULGA BUDRUK, TALUKA – NILANGA,DISTRICT – LATUR – 413 521, MAHARASHTRA BY PROJECT PROPONENT M/S ONKAR SUGAR FACTORY LIMITED, UNIT-2, JAJNUR-ZARI, MOUJE AMBULGA BUDRUK, TALUKA – NILANGA,DISTRICT – LATUR – 413 521, MAHARASHTRA**

---

The Environment Public Hearing in respect of proposed expansion of existing sugar unit from 2,500.0 TCD to 4,800.0 TCD (Expansion of 2,300.0 TCD), Commissioning of New Co-Generation Plant of 18.0 MW & Installation of Multi-Feed Distillery Plant of 150.0 KLPD based on C Molasses/B Heavy Molasses /Syrup & Grain as raw material at Jajnur-Zari, Mouje Ambulga Budruk, Taluka-Nilanga, District – Latur – 413 521, Maharashtra by Project Proponent M/s Onkar

Sugar Factory Limited, Unit-2, Jajnur-Zari, Mouje Ambulga Budruk, Taluka – Nilanga, District – Latur – 413 521, Maharashtra was conducted on Friday, the 21st July, 2023 at the site of the said industry at 11.30 a.m.

Shri Parmeshwar V. Kamble, Sub Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Latur and Convener of the Environment Public Hearing Committee welcomed Sou. Shobha Jadhav, Additional District Magistrate, Latur and Chairperson of the Environment Public Hearing Committee; Shri Sujit Dholam, Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Aurangabad and Member of the Environment Public Hearing Committee, Environmentalists, NGOs, Journalists, Representative of media channels and Company Officials and local people/participants who were present and with permission of Chairperson. Environment Public Hearing Committee started the proceedings.

Convener, Environment Public Hearing Committee informed that as per the Environment Impact Assessment (EIA) Notification of Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (i.e. MoEF & CC, GoI) dated 14th September, 2006 as amended on 1st December, 2009, it is mandatory to conduct prior public consultation to certain projects which are covered in the schedule of the said Notification.

He informed that Maharashtra Pollution Control Board was in receipt of application from Project Proponent M/s Onkar Sugar Factory Limited, Unit-2, Jajnur-Zari, Mouje Ambulga Budruk, Taluka – Nilanga, District – Latur – 413 521, Maharashtra for their proposed expansion of existing sugar unit from 2,500.0 TCD to 4,800.0 TCD (Expansion of 2,300.0 TCD), Commissioning of New Co-Generation Plant of 18.0 MW & Installation of Multi-Feed Distillery Plant of 150.0 KLPD based on C Molasses/B Heavy Molasses /Syrup & Grain as raw material at Jajnur-Zari, Mouje Ambulga Budruk, Taluka-Nilanga, District – Latur – 413 521, Maharashtra.

Convener further informed as per EIA Notification, 2006 the category of project falls under Category A schedule 5 (g) and 5 (j) 1 (d) which requires to obtain prior Environmental Clearance from the Environment, Forest & Climate Change, Govt of India, New Delhi for which prior environmental consultation is mandatory.

Convener informed that the aim of conducting prior public consultation is to make aware, local people who can be participant in the hearing and they should know the developmental activities and Environment Management Plan of the unit.

Project Proponent had submitted online prescribed application alongwith pre-feasibility report to the, Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, New Delhi and it has been considered and given online approval on 09-05-2023.

After sanction from District Collector, Latur to conduct the Physical Environment Public Hearing on Friday, the 21st July, 2023 at 11.30 noon, and as per the Notification dated 14-09-2006 issued by Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (MoEF & CC, GoI), New Delhi and subsequent amendment on 01-12-2019, Member Secretary, Maharashtra Pollution Control Board, Mumbai has constituted Environment Public Hearing Committee vide Board's Office Order No. E- 44 of 2023 under letter no. BO/JD (WPC)/PH/B- 230705- FTS- 0031 dated 05-07-2023 as under:-

| | |
|---|---|
| 1) District Magistrate-Latur<br>or his representative not below | **Chairman** |

the rank of an Additional District Magistrate

2) Representative of Maharashtra Pollution Control Board, Mumbai - Regional Officer – Aurangabad, Maharashtra Pollution Control Board, Aurangabad — **Member**

3) Sub Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Latur — **Convener**

As per said Notification, 30 days' advance public notice was published by Sub Regional Officer, Maharashtra Pollution Control Board, Latur in the Local Newspaper in Daily Sakal for Marathi and in National Newspaper Times of India for English on 19th June, 2023. The public were appealed to send their suggestions, views, doubts or objections regarding the proposed unit.

Also copy of EIA report and executive summery were made available in Marathi and in English at various notified Government offices as under:-

1) Ministry of Environment, Forest & Climate Change, Zonal Office, Western- Central Zone, New

Secretariat Building, Ground Floor, East Wing, Civil Line, Nagpur-440 001;

2) District Collector, Latur;

3) General Manager, District Industries Center, Latur;

4) Chief Executive Officer, Zilla Parishad, Latur;

5) Tahsildar, Tahsil Office -Nilanga,Taluka – Nilanga, District – Latur;

6) Gram Panchayat Office – Ambulga (BK), Taluka – Nilanga, District – Latur;

7) Environment & Climate Change Department, Maharashtra Government, New Administrative Building, 15th Floor, Mantralaya, Madam Cama Road, Mumbai – 400 032;

8) Joint Director (WPC), Maharashtra Pollution Control Board, Kalpataru Point, 1st,2nd,3rd, 4th Floor, Sion-Matunga Scheme Road No.8, Opp. Cine Planet Cinema, Near Sion Circle, Sion (East), Mumbai – 400 022;

9) Regional Officer, Regional Office, Maharashtra Pollution Control Board, Plot No.A-4/1, MIDC

Chikalthana, Behind Dainik Lokpatra, Adjacent to Seth Nandlal Dhoot Hospital, Jalna Road, District – Aurangabad;

10) Sub Regional Officer, Sub Regional Office, Maharashtra Pollution Control Board, Latur;

11) Web site of Maharashtra Pollution Control Board Mumbai;

Convener informed 3 Nos of suggestions has been received by Sub Regional Office, MPCB, Latur regarding the proposed project till Public hearing

Convener informed that an opportunity is given to all participants to raise any doubts, suggestions or objections regarding the proposed project in environmental angle, which can be submitted by orally or in writing also.

Convener asserted that this Committee is only for recording public opinion, views, suggestions, objections regarding the proposed project in environmental angle only and the Committee has no right to approve, reject or recommend the project. The suggestions/objections raised by the participants in the public hearing will be noted and it

will be included in the minutes of the meeting. Similarly, the revised Environmental Assessment Report of the Project Proponent and minutes of the meeting after approval of Chairperson will be submitted through MPCB Head Office to the Department of Environment, Forest & Climate Change, Government of India, New Delhi after taking note of the video recording of the said meeting, suggestions and objections recorded in the meeting. An Expert Committee there takes further decision regarding the same He requested Chairperson of the Environment Public Hearing Committee to inform Project Proponent to start the presentation.

With the permission of the Chairperson, the Environmental Consultant of the project made a presentation on the entire Environmental Management Plan (EMP) for the proposed project. He informed that the total cost for the project will be Rupees 250.0 crores and capital cost for Environment Management will be Rupees 3,880.0 lakh and Recurring cost is 81.4 lakh. He informed that project is ZLD – Zero Liquid Discharge.

After the Presentation, Convener, Environment Public Hearing Committee appealed all participants to raise their suggestions, objections in respect of proposed project in

environmental angle only. While asking questions, full name and residential address should be informed.

**Views, questions, suggestions/objections raised during the Environmental Public Hearing and the answers/promises given by the Project Proponent/ Project Environment Consultant / Environmental Public Hearing Committee :-**

1) **Shri Govind Birajdar, At Post – Val Sangavi, Taluka – Nilanga, District – Latur :-**

If the project is to be expanded, how much will the project cost?

Project Environmental Consultant said that we are expanding the sugar factory. Sugar production will be 2,500.0 TCD to 4,800.0 TCD (increase of 2,300.0 TCD). Rupees 90.0 crores will be spent for it. A new 18.0 MW Co-gen Project will be constructed in the project and it will cost Rs. 40.0 crores.

Similarly, multi feed distillery of 150.0 KLPD project will be installed for which we will spend Rs. 120.0 crores. Thus, total Rs. 250.0 crore will be spent on the whole project.

2) **Shri Pundarao Jadhav, At Post – Sharale (Wan), Taluka – Nilanga, District – Latur :-**

After expansion of the project, how and how much the people of this area will be benefitted? Please guide.

Project Promoter replied that the expansion would provide maximum market price for sugarcane crop to the farmers in the area. The sugarcane of the farmers will be crushed on time, so the local farmers will not face weight loss of the sugarcane crop and their damage will be avoided. Due to the expansion, direct employment opportunities will be created in the project. These are going to be direct benefits.

Because of project expansion, there will be a need for vehicles here. Project expansion will increase the local business here. This will increase the indirect business in the area tremendously.

3) **Shri Narsingh Birajdar, At Post – Hosur, Taluka – Nilanga, District – Latur :-**

The measure to increase the height of the chimney for air pollution control is explained. Increasing the height of the chimney will move the smoke away from the chimney. But it is doubtful whether air pollution will stop or reduce. However, an analysis should be given about this. Similarly, the expansion project will increase the water consumption in the

project. So, if the river water is brought and released in the lake from where it will be pumped, then the water there will not decrease due to pumping.

It is heard that this factory started investment of 40 crores. 250 crores is added in it. It will be a huge investment.

There is an officer class in the project. They should build houses and settle here only. This will help in the development/business of the area.

Environmental Consultant of the project answered that two additional boilers will be installed in the expansion project. One 60.0 Ton bagasse fire boiler in sugar section, 30.0 Ton bagasse fire boiler in distillery plant. Biogas will be used as the main fuel for this.

If we look at the properties of bagasse, it contains only 2% as ash. Sulfur content is only 0.05. Fuel as coal will not be used here. Because coal increases the amount of ash and pollutants. Biomass generated in the project will be used as fuel.

Now, regarding air pollution, the Central Pollution Control Board has issued directives regarding the height of how many tonne boilers should be. A 60.0 Ton boiler will have a chimney of 65.0 meter. A chimney of 45.0 meters

height will be installed for a 30 Ton boiler. Now wet scrubbers are operational.

A very modern ESP – Electro-Static-Precipitator air pollution control system will be installed in the chimney. The ESP pollution control system has a pollution control efficiency of 99.9%. So air pollution will be under control.

4) **Shri Govind Bevnale, Residence – Rathoda, Taluka – Nilanga, District – Latur :-**

What measures will be taken to prevent water pollution due to the project?

Environmental Consultant said that we will first consider the water pollution in the sugar factory. The sugar factory will produce 4,800.0 Tonnes of sugar per day and the cogeneration plant will produce 18.0 MW. The generation of waste water will be about 598.0 $M^3$/day. All waste water will be treated in Effluent Treatment Plant. The project has 20 hectares of green belt area.

The main pollutant from the project is spent wash.

As per directives of the Central Pollution Control Board, New Delhi, the project should be ZLD – Zero Liquid Discharge. Accordingly, not a single drop of waste water from the distillary plant can be released outside the plant. Spent wash will be processed for that. The generated spent

wash will be bio-methinized. The gas generated from it will be used in the boiler.

Hence, the quantity of spent wash will be reduced by 65%. Then the spent wash will be taken to MEE for processing. Its concentration reaches 40% there. The spent wash will be made into powder form in a spray dryer. The contents of potash in the spent wash powder will be 18-20%. The spent wash powder will be sold as fertilizer to the companies. So, the factory will get additional income. Therefore, the distillery project will be ZLD project.

The condensate from the MEE will return to the condensate polishing unit. It will be processed and reused for further processing. Not even a single drop of water from the project is allowed to be released outside the project.

**5) Shri Sharad Somvanshi, Sarpanch, Kate Javalga Gram Panchayat, Taluka – Nilanga, District – Latur :-**

A presentation was made about the project. Here 67% population is educated and 51% people are employed. Hence, the commissioning of this project is very important for us. But when we think about the environment, some questions arise before us.

Looking at the presentation of the expansion project, the question arises that how will the spent wash generated in the distillation plant will be disposed of? Now the Hasanur resident here expressed the opinion that the water should be released in the river pond as much as the water drawn from the lake. Explanation about this should be given.

Environmental Consultant replied that this distillation project is a multi-feed project. As raw material we will use molasses, syrup and ----- in season. But grains will be used as raw material during off season.

The question is how to dispose of the spent wash generated by using molasses in the distillery. The process of spent wash will be done as per the directives as issued by the Ministry of Environment, Forest and Climate Change, Government of India, New Delhi. First biomethinazene, then MEE – the conversion of liquid spent wash into solid form, the gas of which will be used in a boiler and the spent wash will be powdered in a spray dryer.

The spent wash powder contains 18-20% potash. It can be sold to farmers as fertilizer. Also the condensate from MEE is used back to the condensate polishing unit, processed and used again for processing. This means that the spent wash will not accumulate and not a single drop of it will go out of the project.

Many people are opposed to the project because they remember the old way of spent wash. First 30 days spent wash was stored. As per the current guidelines of the central government, only five days of storage is allowed. RCC, HDB for storage lining are compulsory.

Now, as per the directives of Central Pollution Control Board and Maharashtra Pollution Control Board, Online monitoring system will be implemented in the project. If the pollutant is released slightly more than the prescribed standards, a message is immediately sent to the MPCB officer, environmental consultant, and the concerned factory official on the mobile phone.

6) **Shri Sujit Dholam, Member, Environment Public Hearing Committee :-**

Your EIA report mentions CPU sludge and e-sludge and mixing of bio-composting as a process for the same, so detailed information should be given on the same, which type of bio-composting system will be installed.

Environmental Consultant said that the press mud produced in the factory in this area constitutes about 4% of the press mud produced in the 2,500.0 TCD project, which is used as a soil conditioner in the fields in the factory area. The press mud to be prepared is mixed with ETP sludge, concrete yard for e-sludge is prepared and mixed. It is given

to farmers as a soil conditioner. The nutritional value of the resulting press mud is increased by adding culture to it. If it is cultured, its NPK increases and the nutritional value remains good.

7) **<u>Shri Eshwar Baburao Kale, Residence – Kelgaon, Taluka – Nilanga, District – Latur :-</u>**

We are expanding the sugar factory in the project. It requires sugarcane, the raw material of which can be procured from local farmers. Similarly, the bagasse required in Co-gen. project can be taken from the sugar factory. Bagasse is the raw material of Co-gen production. The molasses required for the distillery plant- C molasses, B molasses will be used as raw material during season.

After the season is over, it can be taken from farmers as raw material – Maize, Rice. This distillery project is a multi-feed distillery. Molasses, syrup during the season and corn, rice will be used after the season.

Convener, Environment Public Hearing Committee opined that they reviewed the project. Environmental Management Plan (EMP) of the project was discussed in detail – water pollution control measures, air pollution control measures and all pollution control systems were discussed in detail.

Convener here appealed the participants if they had any suggestions or objections. There was no response from the participants.

Convener requested Chairperson, Environmental Public Hearing Committee to take further action regarding the meeting.

While concluding the meeting, Hon. Chairperson, Environment Public Hearing Committee said that today Environment Public Hearing was arranged for proposed project of M/s Onkar Sugar Karkhana Private Limited, Unit-2 for their proposed expansion of Sugar Factory of sugar unit from 2,500.0 TCD to 4,800,0 TCD (2,300 TCD ), installation of new Co-generation Plant of 18.0 MW and new Multi-Feed Distillery Unit of 150.0 KLPD based on C Molasses/B Heavy Molasses/Syrup & Grain as raw material.

By presentation, the company has informed the cost of the project, Environment Management Plan (EMP). Participants have also raised their views, suggestions and objections regarding EMP which have been answered by the Environment Consultant of the Project Proponent. It will be included in the minutes of the meeting and minute of the meeting alongwith written suggestions/objections

and Final Environment Impact Assessment Report will submitted with the approval of Chairperson through MPCB Head Office to Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, New Delhi. The video shooting of the meeting is also carried as per the guidelines.

Chairperson, Environment Public Hearing Committee again appealed all to raise any suggestions, objections regarding the proposed project in environmental angle only. There was no response from the audience. She said that as there is no response from the local people, the meeting is declared as concluded.

Meeting ended extending thanks to the Chair.

Written Three suggestions/objections are enclosed herewith.

**(Parmeshwar V. Kamble)**
Convener,
Environment Public Hearing Committee
And
Sub Regional Officer,
Maharashtra Pollution Control Board,
Latur

**(Sujit Dholam)**
Member,
Environment Public Hearing Committee
And
Regional Officer,
Maharashtra Pollution Control Board,
Aurangabad

**(Sou. Shobha Jadhav)**
Chairperson,
Environment Public Hearing Committee
And
Additional District Magistrate, Latur,
District - Latur

**प्रकल्प प्रवर्तक मे. ओंकार साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेड, युनिट - २, जाजनूर-झारी, मौजे - अंबुलगा बुद्रुक, तालुका-निलंगा, जिल्हा-लातूर - ४१३ ५२१, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता - २,५००.० टी.सी.डी. वरुन ४,८००.० टी.सी.डी.पर्यंत (२,३००.० टी.सी.डी.ने वाढ), नविन १८.० मेगा वॅट सहवीज निर्मिती प्रकल्प आणि सी मोलॅसिस/बी हेवी मोलॅसिस/सिरप आणि ग्रेन या कच्च्या मालापासून नविन १५०.० किलोलिटर मल्टीफिड आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. ओंकार साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेड, युनिट - २, जाजनूर-झारी, मौजे - अंबुलगा बुद्रुक, तालुका-निलंगा, जिल्हा-लातूर - ४१३ ५२१, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता - २,५००.० टी.सी.डी. वरुन ४,८००.० टी.सी.डी.पर्यंत (२,३००.० टी.सी.डी.ने वाढ), नविन १८.० मेगा वॅट सहवीज निर्मिती प्रकल्प आणि सी मोलॅसिस/बी हेवी मोलॅसिस/सिरप आणि ग्रेन या कच्च्या मालापासून नविन १५०.०

किलोलिटर मल्टीफिड आसवणी प्रकल्प उभारणी  संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २१ जुलै , २०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

श्री परमेश्वर वि. कांबळे,  उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ. शोभा जाधव, अपर जिल्हादंडाधिकारी, लातूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री सुजीत ढोलम, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती,प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. ओंकार साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेड, युनिट - २, जाजनूर-झारी, मौजे - अंबुलगा बुद्रुक, तालुका-निलंगा, जिल्हा-लातूर - ४१३ ५२१, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता - २,५००.० टी.सी.डी. वरुन ४,८००.० टी.सी.डी.पर्यत (२,३००.० टी.सी.डी.ने वाढ), नविन १८.० मेगा वॅट सहवीज निर्मिती प्रकल्प आणि सी मोलॅसिस/बी हेवी मोलॅसिस/सिरप आणि ग्रेन या कच्च्या मालापासून नविन १५०.० किलोलिटर मल्टीफिड आसवणी प्रकल्प उभारणी

संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए आसवणी - ५ (जी), साखर उद्योग - ५ (जे), सहविद्युत निर्मिती - १ (ड) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

सदस्य, आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०९-०५-२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, लातूर, यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास शुक्रवार , दिनांक २१ जुलै, मार्च , २०२३ रोजी सकाळी ११. ३० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ४४ / २०२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०७०५ एफटीएस -००३१ दिनांक ०५-०७-२०23 अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, लातूर, - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

**२)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
जिल्हा - औरंगाबाद,

३) उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
लातूर

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक सकाळ यात व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक १९-०६-२०२३ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या

माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, लातूर,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय-निलंगा, तालुका- निलंगा, जिल्हा- लातूर,

६) ग्रामपंचायत कार्यालय - अंबुलगा (बु.), तालुका- निलंगा, जिल्हा- लातूर,

७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

८) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

९) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूखंड क्रं.ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा , दैनिक लोकपत्रच्या मागे, सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल शेजारी, जालना रोड, जिल्हा- औरंगाबाद

१०) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्लॉट नं.पी-१०, लातूर जिल्हा उद्योग समुह इमारत, एमआयडीसी लातूर - ४१३ ५३१

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, लातूर यांना तीन सूचना प्राप्त झालेल्या आहेत ( जनसुनावणी पर्यंत)

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात लेल्य सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पासाठी एकूण खर्च २५०.० कोटी खर्च येणार असून तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी

भांडवली खर्च - रुपये ३,८८०.० लाख, तर आवर्ती खर्च - रुपये ८१.४ लाख रुपये आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **<u>गोविंद बिराजदार, मुक्काम पोस्ट--वळसांगवी, तालुका-निलंगा, जिल्हा-लातूरः-</u>**

प्रकल्पाचे विस्तारिकरण होणार आहे, तर प्रकल्पावर किती खर्च होणार आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आपण साखर कारखान्याचे विस्तारिकरण करत आहोत. साखर उत्पादन २,५००.० टीसीडी ते ४,८००.० टीसीडी (२,३००.० टीसीडी) करणार आहोत. त्यासाठी ९०.० कोटींचा खर्च येणार आहे, प्रकल्पात नविन १८.० मेगावॅटचा सहवीज निर्मिती (Co-gen Project) उभारणी करण्यात येणार असून त्यास ४०.० कोटी रुपये खर्च येणार आहे. त्याचप्रमाणे १५०.० किलो लिटर आसवणी प्रकल्प

स्थापन करणार असून त्यास १२०.० कोटी रुपये खर्च करणार आहोत. एकूण प्रकल्पासाठी सुमारे २५०.० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे.

२) **<u>श्री पुंडराव जाधव, मुक्काम पोस्ट - शिराळे (वां), तालुका-निलंगा, जिल्हा-लातूरः-</u>**

प्रकल्पाचे विस्तारिकरण केल्यानंतर या भागातील लोकांचा कसा व किती फायदा होईल याबाबत मार्गदर्शन करावे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की विस्तारिकरणामुळे परिसरातील शेतक-यांना ऊसाला जास्तीत जास्त बाजारभाव देण्यात येईल. शेतक-यांच्या ऊसाचे वेळेवर गाळप होईल, त्यामुळे ऊसाच्या वजनात घट होणार नाही. त्यांचे नुकसान टाळण्यात येईल. विस्तारिकरणामुळे प्रकल्पात रोजगार निर्मिती होणार आहे. हे प्रत्यक्ष फायदे होणार आहेत. तर प्रकल्प विस्तारिकरणामुळे येथे वाहनांची गरज भासेल प्रकल्प विस्तारिकरणामुळे येथील स्थानिक व्यवसायात वाढ होईल. त्यामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

३) **<u>श्री नरसिंग बिराजदार, मुक्काम पोस्ट-होसुर, तालुका-निलंगा, जिल्हा-लातूरः-</u>**

हवा प्रदूषण नियंत्रणासाठी चिमणीची उंची वाढविणार असल्याची उपाययोजना सांगितली. चिमणीची उंची

वाढविल्याने चिमणीतील धूर जरा दूर जाईल. पण हवा प्रदूषण थांबेल किंवा कमी होईल याबाबत शंका वाटते. तरी याबाबत विश्लेषण सांगावे. त्याचप्रमाणे विस्तारिकरण प्रकल्पामुळे प्रकल्पात पाण्याचा वापर वाढेल. तर जेथून उपसा करण्यात येईल, त्या तलावात नदीचे पाणी आणून सोडले, तर उपसा केल्यामुळे तेथील पाणी कमी होणार नाही, त्यासाठी ही विनंती. हा कारखाना चाळीस कोटी गुंतवणूक सुरु केला असे ऐकले. त्यात २५० कोटींची भर पडते. खूप मोठी गुंतवणूक राहणार आहे.

प्रकल्पातील अधिकारी वर्ग आहे. त्यांनी येथे घरे बांधून स्थायिक राहावे. त्यामुळे परिसराचा विकास होण्यास मदत होईल.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की विस्तारिकरण प्रकल्पात अतिरिक्त दोन ब्रॉयलर बसविणार आहोत. एक ६०.० टनाचा बगॅस फायर बॉयलर साखर विभागात, तर आसवणी प्रकल्पात ३०.० टनाचा बगॅस फायर बॉयलर. त्यासाठी बायोगॅस हे मुख्य इंधन म्हणून वापरण्यात येईल.

बगॅसचा गुणधर्म पाहिला तर त्यात राखेचे प्रमाणे हे फक्त २% असते. सल्फरचे प्रमाण हे ०.०५ एवढेच असते. येथे कोळसा म्हणून इंधन वापरण्यात येणार नाही. कारण कोळशामुळे राख

व प्रदूषकांचे प्रमाण वाढते. प्रकल्पात उत्पन्न होणारा बायोमास हेच इंधन म्हणून वापरण्यात येणार आहे.

आता हवा प्रदूषणाबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने किती टनाच्या बॉयलरला किती उंची असावी याबाबत मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. ६० टनाच्या बॉयलरला ६५.० मीटरची चिमणी लावण्यात येईल. तर ३० टनाच्या बॉयलरला ४५.० मीटरच उंचीची चिमणी बसविणार आहे. आता वेट स्क्रबर कार्यान्वित आहेत. तर चिमणीस अत्यंत आधुनिक अशी ईएसपी - इलेक्ट्रो-स्टॅटिक-प्रेसिपरेटर ही हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. ईएसपी या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची प्रदूषण नियंत्रणाची क्षमता ही ९९.९% आहे. त्यामुळे हवा प्रदूषण हे नियंत्रणात राहिल.

४) **<u>श्री गोविंद बेवनाळे, राहणार-राठोडा, तालुका-निलंगा, जिल्हा-लातूरः-</u>**

प्रकल्पामुळे पाण्याचे प्रदूषण न होण्यासाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहेत?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रथम साखर कारखान्यातील पाण्याचा प्रदूषणाचा विचार करु. साखर कारखान्यात ४,८००.० टन प्रती दिन साखर उत्पादन होणार असून सहविद्युत प्रकल्पात १८.० मेगावॅट उत्पादन होणार आहे. त्यात सांडपाण्याची निर्मिती ही सुमारे ५९८.० घनमीटर

प्रतिदिन होणार आहे. सर्व सांडपाण्यावर ईटीपीत प्रक्रिया करण्यात येईल. प्रकल्पात २० हेकटर हरित पट्टा क्षेत्र आहे.

प्रकल्पातील मुख्य प्रदूषण हे स्पेंट वॉश आहे. केंद्रीय

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पास झिरो लिक्विड डिस्चार्ज बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार आसवणी प्रकल्पातून सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडता येतच नाही. त्यासाठी स्पेंट वॉशवर प्रक्रिया करण्यात येणार आहे. तयार होणा-या स्पेंट वॉशचे बायो-मिथिनायझेशन करण्यात येईल. त्यापासून उत्पन्न होणारा गॅस हा बॉयलरला वापरण्यात येईल. त्यामुळे स्पेंट वॉशचे प्रमाण हे ६७% कमी होते. तो स्पेट वॉश एमईई मध्ये प्रक्रियेसाठी नेण्यात येईल. तेथे त्याचे कॉन्स्नट्रेशन करण्यात येऊन त्याचे प्रमाण ४०% पर्यंत येते. त्या स्पेंट वॉ़शची स्प्रे ड्रायरमध्ये पावडऱ तयार करण्यात येईल. त्या स्पेंट वॉ़शच्या पावडरमध्ये पोटॅशचे प्रमाण हे १८-२०% असेल. ती स्पेंट वॉशची पावडर ही कंपन्यांना खत म्हणून विकण्यात येणार आहे. त्यामुळे कारखान्यास अतिरिक्त उत्पन्न मिळणार आहे.

त्यामुळे आसवणी प्रकल्पसुध्दा हा झेलएलडी प्रकल्प असेल. एमईईचे जे कन्डेन्सेट आहे, ते परत कन्डेन्सेट पॉ़लिशिंग युनिटला जाईल. त्यावर प्रकिया करुन ते परत प्रक्रियेसाठी

वापरण्यात येईल. प्रकल्पातील एक थेंबही पाणी प्रकल्पाबाहेर सोडण्याची परवानगी नाही.

**५) <u>श्री शरद सोमवंशी, सरपंच, काटेजवळगा ग्रामपंचायत, तालुका-निलंगा, जिल्हा-लातूरः-</u>**

प्रकल्पाविषयी सादरीकरण करण्यात आले. येथे ६७% लोकसंख्या शिक्षित असून ५१% लोकांना रोजगार आहे. त्याअनुषंगाने हा प्रकल्प उभारणी होणे आमच्यासाठी खूपच महत्वाची आहे. पण पर्यावरणाचा विचार करताना आमच्यासमोर काही प्रश्न निर्माण होतात. विस्तारीकरण प्रकल्पाचे सादरीकरण पाहताना प्रश्न उत्पन्न होतो की आसवणी प्रकल्पात उत्पन होणारा स्पेंट वॉशची विल्हेवाट कशा प्रकारे लावण्यात येईल? आता येथील हसनूर रहिवाशी यांनी मत मांडले की तलावातील उपसा केलेल्या पाण्याएवढे पाणी नदीतील तलावात सोडण्यात यावे. याबाबत स्पष्टीकरण.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की हा आसवणी प्रकल्प हा मल्टीफीड प्रकल्प आहे. कच्चा माल म्हणून मोलॅसिस, सिरप व आणि ----- हे मोसमात (सिझनमध्ये) वापरणार आहोत. तर सिझन नसताना कच्चा माल म्हणून धान्ये वापरण्यात येतील.

आसवणी प्रकल्पात मोलॅसिस वापरुन उत्पन्न होणा-या स्पेंट वॉशवर विल्हेवाट कशी लावणार हा प्रश्न आहे. तर स्पेंट

वॉशची प्रक्रिया ही पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशांनुसारच करण्यात येणार आहे. प्रथम बायोमिथिनाझेन, नंतर एमईई - म्हणजे द्रव स्वरुपातील स्पेंट वॉशचे सॉलिड रुपात रुपांतर, त्यातील गॅस हा बॉयलरला वापरण्यात येऊन त्या स्पेंट व़ॉशची स्प्रे ड्रायरमध्ये पावडऱ तयार करण्यात येईल. त्या स्पेंट व़ॉशच्या पावडरमध्ये १८-२०% पोटॅश असते. ते खत म्हणून शेतक-यांना विकता येते. तसेच एमईईचे जे कन्डेन्सेट आहे, ते परत कन्डेन्सेट प़ॉलिशिंग युनिटला वापरायचे, त्यावर प्रकिया करुन ते परत प्रक्रियेसाठी वापरणे. म्हणजे स्पेंट वॉश हा साठवणार नाही व त्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. ब-याच जणांना स्पेंटवॉशची जुनी पध्दत आठवत असले, म्हणून ते प्रकल्पास विरोध करतात. प्रथम ३० दिवस स्पेंट वॉश साठवण-स्टोरेज करण्यात यायचे. आताच्या केंद्र सरकारच्या निर्देशानुसार फक्त पाच दिवसच साठवण/स्टोरेज करण्यात येते. तोही साठवण/स्टोरेज करण्यासाठी आर.सी.सी., एच.डी.बी. लाईनिंगचे निर्देश आहेत.

आता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांप्रमाणे ऑन लाईन मॉनिटरिग सिस्टिम ही प्रकल्पात कार्यान्वित करण्यात येणार आहे. पारित मानकांपेक्षा जराही जास्त प्रदूषके सोडली की लगेच राज्य प्रदूषण नियंत्रण अधिकारी, पर्यावरण सल्लागार, व संबधित

कारखान्याच्या अधिका-यास मोबाईलवर संदेश पाठविण्यात येतो.

**६) <u>श्री सुजीत ढोलम, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-</u>**

आपल्या ईआयए अहवालात उल्लेख आहे सीपीयु स्लज आणि ई स्लज व त्यासाठी प्रक्रिया म्हणून मिक्सिंग बायो-कंपोस्टींग, तर त्याबाबत विस्तृत माहिती देण्यात यावी, कुठल्या प्रकारची बायो-कंपोस्टींग यंत्रणा बसविण्यात येईल याची माहिती द्यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की या भागात कारखान्यात जो प्रेस मड तयार होतो तो २,५००.० टीसीडी प्रकल्पात जवळजवळ ४% प्रेस मड तयार होतो, तो कारखाना परिसरातील क्षेत्रातील शेतात सॉईल कन्डिशनर म्हणून वापरला जातो. तयार होणार प्रेस मड हा मिक्स करुन येणारा ईटीपी स्लज, ई स्लज यासाठी कॉक्रीट यार्ड तयार करुन तो मिक्स केला जातो. तो सॉईन कन्डिशनर म्हणून शेतक-यांना दिला जातो. तयार होणा-या प्रेस मडमध्ये कल्चर टाकून त्याची न्युट्रीशन व्हॅल्यु वाढविली जाते. जर त्याच्यात कल्चर टाकले, तर त्याची एनपीके वाढल्याने न्युट्रीशन व्हॅल्यू चांगली राहते.

**७) <u>श्री ईश्वर बाबूराव काळे, राहणार-केळगाव, तालुका-निलंगा, जिल्हा-लातूर:-</u>**

प्रकल्पात साखर कारखान्याचे विस्तारिकरण करणात आहोत. त्यास ऊस लागतो, तो कच्चा माल स्थानिक शेतक-यांकडून

घेता येईल. त्याचप्रमाणे सहवीज प्रकल्पात जो बगॅस लागतो, तो साखर कारखान्याकडून घेता येईल. बगॅस ही सहवीज निर्मितीचा कच्चा माल आहे. आसवणी प्रकल्पासाठी लागणारे मोलॅसिस- सी मोलॅसिस, बी मोलॅसिस हे हंगामात (सिझनमध्ये) कच्चा माल म्हणून वापरण्यात येईल. हंगाम संपल्यानंतर शेतक-यांकडून धान्य म्हणून कच्चा माल म्हणून घेता येईल - मका, तांदूळ. हा आसवणी प्रकल्प मल्टीफीड डिस्टीलरी आहे. हंगाम असताना मोलॅसिस, सिरप व हंगाम संपल्यानंतर धान्याचा वापर मका, तांदुळ करण्यात येईल.

आयोजक यांनी मत मांडले की आपण प्रकल्पाचा आढावा घेतला. प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजना (ईएमपी) बाबत सविस्तर चर्चा केली - जल प्रदूषण त्यावरिल उपाय, हवा प्रदूषण त्यावरिल उपाय व सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. आयोजक यांनी उपस्थितांना काही सूचना, आक्षेप आहेत काय याबाबत विचारणा केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. आयोजक यांनी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना बैठकीची पुढील कार्यवाही करण्याची विनंती केली.

मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की आज मे. ओंकार साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेड, युनिट-२ च्या विस्तारिकरण व नविन आसवणी व सहवीज निर्मिती बाबत जनसुनावणी

आयोजित करण्यात आली. सादरीकरणाव्दारे कंपनी उभारणी खर्च, विविध प्रदूषणासाठी तयार केलेला पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती देण्यात आली. स्थानिकांनीही आपल्या सूचना, शंका उपस्थित केल्या व त्यास प्रकल्प प्रवर्तक आणि पर्यावरण सल्लागार यांनी उत्तरे दिलेली आहेत. त्याचा समावेश हा बैठकीच्या इतिवृतात करण्यात येईल व ते इतिवृत, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप व अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत शासनास सादर करण्यात येईल. बैठकीची व्हिडिओ शुटीगसुध्दा तयार करण्यात आलेली आहे अध्यक्षा यांनी उपस्थितांना काही शंका, सूचना, आक्षेप नोंदवायचे असल्यास त्याबाबत विचारणा केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. अध्यक्षा यांनी उपस्थितांची सूचना, आक्षेप नाही असे दिसते असे मत मांडून जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षा यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेले ------03----लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहोत.

**(परमेश्र्वर व्ही. कांबळे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण
मंडळ, लातूर

**(सुजीत ढोलम)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण
मंडळ, औरंगाबाद

**(सौ. शोभा जाधव)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, लातूर,
जिल्हा - लातूर